International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# राजश्री छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा

**रंगराव बाजीराव साळुंके**
छ.शिवाजी मा.उच्च माध्यमिक विद्यालय दांडेगाव
**Corresponding Author:** **रंगराव बाजीराव साळुंके**
**DOI- 10.5281/zenodo.14650080**

**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून भारतीय समाजव्यवस्थेवर वर्णव्यवस्था,जातीव्यवस्था,रूढी,परंपरा,अंधश्रद्धा,कर्मकांड इत्यादी गोष्टीचा प्रभाव जाणवतो त्यामुळे समाजात जाती-पाती नुसार उच्चनीचतेची भावना वाढीस लागली होती.तसेच समाजात प्रत्येक व्यक्तीची पायरी ठरली होती जातीनुसार व्यवसाय ठरला होता जातिव्यवस्थेवर आधारलेल्या या सामाजिक रचनेत ब्राह्मण वर्ग शिखरावर होता.तर दलित वर्ग तळाशी होता.या जाती-पाती विरुद्ध जी एक सामाजिक सुधारणेची चळवळ महाराष्ट्रात सुरु झाली त्या चळवळीत महात्मा फुले यांच्या बरोबर राजश्री छत्रपती शाहू महाराजांचे योगदान मोलाचे आहे

**उद्दिष्ट्ये :**

१) एकोणविसाव्या शतकातील सामाजिक परिस्थितीचा आढावा घेणे.

२) राजश्री छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास करणे.

३) राजश्री छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणेतील योगदानावर प्रकाश टाकने.

**गृहीतके :**

१) राजश्री छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा महत्वाच्या आहेत.

२) राजश्री छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणांचा प्रभाव आजही समाजावर जाणवतो.

**शाहू कालीन सामाजिक स्थिती:**

कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे राजे शिवाजी यांचा 15 डिसेंबर 1883 रोजी अहमदनगर च्या किल्ल्यात मृत्यू झाला.ते निपुत्रिक असल्याने त्यांच्या पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी कागल चे घाटगे घराण्यातील जयसिंगराव आबासाहेब घाटगे यांचा पुत्र यशवंतराव यांना 17 मार्च 1884 रोजी दत्तक घेतले. यशवंतरावांचे नाव शाहू छत्रपती ठेवण्यात आले होते हेच पुढे राजश्री शाहू छत्रपती या नावाने कोल्हापूर संस्थानाच्या गादीवर 2 एप्रिल 894 रोजी बसले.त्यावेळी शाहू महाराजांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले होते समाजात उच्च-नीचतेची दरी मोठ्या प्रमाणात पडली होती ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व वाढले होते त्यातुन वरिष्ठ कनिष्ठ अशा सामाजिक अपप्रथा वाढल्या होत्या या प्रश्नांची झळ खुद्द महाराजांना पण सोसावी लागली होती.शाश्त्रोक्त प्रकरणाने महाराज यांना या प्रथांची खोली कळाली होती. त्यांच्या लक्षात आले छत्रपती घरातील व्यक्तीला जर ही वागणूक मिळत असेल तर सामान्य व्यक्तीचे काय हाल होत असतील या अनिष्ट रूढी प्रथा परंपरांना चा बंदोबस्त करण्याची गरज महाराजांना वाटू लागली त्यासाठी ब्राह्मणोत्तर चालवल उभारण्याची गरज महाराजांना वाटू लागली.

छत्रपती शाहू महाराजांनी या घटने नंतर आपले लक्ष सामाजिक सुधारणा कडे वळून समाजातील अनिष्ट रूढी प्रथा परंपरा नष्ट करण्यासाठी योजना असलेल्या पाहायला मिळतात

**अस्पृश्यता निवारणाचे कार्य:**

अस्पृश्यतेचा अर्थ स्पर्श करण्यास अयोग्य असा होतो.समाजात महार मांग चांभार ढोर अशा काही जाती होत्या. अस्पृश्यतेच्या नावाखाली या जातीतील लोकांना पशूप्रमाणे वागणूक दिली जात असे.या समाजातील लोकांना गावाच्या बाहेर आपली घरे बांधून राहावे लागत असे. समाजात स्पर्श अस्पर्श असी दरी वाढत चालली होती.हे महाराजांच्या लक्षात आले. ही दरी मिटवण्यासाठी महाराजांनी काही उपाययोजना केलेल्या पाहायला मिळतात. महाराजांनी 1916 मध्ये एक आदेश काढला त्यात कोल्हापूर संस्थानातील सर्व अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की संस्थानात जे अस्पर्श नोकरीला आहेत त्यांना प्रेमाने व समतेने वागवावे जर कोणी अधिकार्यांनी आदेश मोडला तर त्याला पगार दिला जाणार नाही अथवा त्याने आपल्या पदाचा राजीनामा देऊन पदाचा त्याग करावा.यापुढे जाऊन महाराजांनी स्वतः अस्पर्शता निवारणासाठी 6 सप्टेंबर 1919 रोजी एक जाहीरनामा काढला या जाहीरनाम्यात म्हटले की संस्थानातील सर्व सार्वजनिक स्थळे,इमारती,सरकारी कार्यालय,विहिरी,शाळा येथे मनुष्याचा विटाळा मानता कामा नये.तसे झाले तर गावातील पाटील व तलाठी यांना जबाबदार धरले जाईल.तसेच शाळेत सर्वांना समान वागणूक दिली जावी त्यासाठी मुख्याध्यापकांना जाब विचारला

जाईल.महाराजांनी 1917 साली आपल्या लष्करी फडात चार अस्पर्शांची नेमणूक केली.1920 मध्ये महाराजांनी शहरातील पोलीस गेटवर सोळा महारांची नेमणूक केली होती.

छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राजदंडाचा वापर लोककल्याण व सामाजिक सुधारणेसाठी केला ते बोलके समाज सुधारक नव्हते तर महात्मा फुले यांच्या विचार व कार्याचा वारसा पुढे चालू ठेवणारे प्रत्यक्ष कृती करणारे सुधारक होते म्हणूनच बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना आपल्या गुरूचा दर्जा दिला होता.

**महार वतन बंदी कायदा:**

परंपरागत गावात अनेक वतने चालायची त्यात अस्पर्श समाजाला महार वतनाच्या नावाखाली गावातील सर्व खालच्या दर्जाची कामे करावी लागत असत ही एक प्रकारची गुलामगिरीच होती.या गुलामगिरीच्या नावाखाली गावातील वरिष्ठ समाज महार समाजाची आर्थिक व सामाजिक पिळवणूक करत असे.पोटाचीखळगी भरण्यासाठी आणि सवर्णांच्या भीतीने हा समाज ही कामे वर्षानुवर्षे करत होता यावर कायमचा उपाय करण्यासाठी राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी मे 1921 मध्ये एक आदेश काढून महार वतन पद्धती नष्ट केल. या समाजाला गुलाम बनवणाऱ्या पद्धती पासून मुक्त करण्याचे काम केले.परंतु ही पद्धती पुढे संस्थांना बाहेरील महाराष्ट्रातील काही भागात चालू होती पुढे 1958 मध्ये मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांच्या पुढाकाराने कायदा करून ही पद्धती कायमची बंद करण्यात आली.

**जातीवाचक नावात बदल:**

राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी जाती व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी ज्या योजना आखल्या व प्रत्यक्ष कृतीतून अमलात आणल्या.त्या काळात समाजातील अस्पर्श समाज त्यांच्या आडनावावरून तुच्छ लेखला जायचा त्यांना त्यांच्या कामावरून आडनावे दिली जायची.या आडनावांच्या आडून या समाजाला समाजात खालच्या दर्जाचे समजले जाऊ लागले त्यामुळे महाराजांनी या नावात बदल करून या समाजातील लोकांना सुवर्ण समाजातील जाट,पंडित,सरदार,अशी नावे दिली होती. अशी नावे अस्पर्शांना देऊन छत्रपती शाहू महाराजांची अस्पृश्यांना या भेदभाव जनक जाचक जातीवाचक नवान पासून सुटका केली .

**वेठबिगारी पद्धतीवर बंदी:**

महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेचा अभ्यास करता या काळी महाराष्ट्रात सुवर्णांनकडून कनिष्ठ वर्गातील लोकांचे शोषण मोठ्या प्रमाणात केले जायचे या पिळवणुकीचे उदा.म्हणजे वेठबिगारी होय या काळी महार-मांग अशा कनिष्ठ वर्गातील लोकांना विनामोबदला वरिष्ठ वर्गातील लोकांची कामे करावी लागत असत त्यातून या समाजाची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होत असे.अशा माणसांना जनावरा प्रमाणे वागणूक देणाऱ्या प्रथांच्या विरोधात महाराज होते.एकदा महाराज हुबळी येथे परिषदेसाठी गेले असता हुबळीच्या जनतेने त्यांचे यथोचित स्वागत केले महाराजांना कार्यक्रम स्थळी नेण्यासाठी एक रथ आणण्यात आला लोकांनी महाराजांना रथावर बसवले व रथाचे घोडे सोडून लोक स्वतः रथ ओढून लागले त्यावर महाराज त्यांना म्हणाले “जर तुम्ही रथ बोलणार असाल तर मी रथातून खाली उतरून पायी चालेल ते पुढे म्हणाले आज पर्यंत तुम्हाला जनावरांप्रमाणे वागणूक मिळाली तसेच जनावरे करण्यास मी इथे आलो नाही तर त्या जनावरांना ही माणसे बनवण्याकरता आलो आहे” यातून महाराजांची माणसांना माणूस म्हणून जगवण्यासाठीची तळमळ जाणवते या तळमळी पोटी त्यांनी आपल्या संस्थानात वेठबिगारी सारखी अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी कायदा करून तिला मुळातून संपवण्याचे कार्य केले

**भटक्या विमुक्त जातीसाठी कार्य:**

महाराष्ट्रात त्या काळी ज्या प्रमाणे अस्पर्श समाज होता त्याच प्रमाणे काही भटक्या जमाती होत्या त्या सतत भटकंती करून आपल्या उपजीविका भागवत असत या जमातीत बंजारा,कैकाडी,राजपूत,बामटा,बेरड,फाशीपारधी,कोल्हाटी इत्यादी जमातीचा समावेश होता.या जमाती चोरी,दरोडेखोरी,लुटमारी करून आपल्या उपजीविका भागवत असत भाकरीसाठी सुरू झालेली ही विघातक कामे पुढे त्यांचा व्यवसाय बनवू लागली या जमाती त्यांच्या कडील कलागुणांचा उपयोग करून ह्या लुटमारी सारख्या घटनाकरत असत.त्यामुळे या जमातीची दहशत समाजात पसरली होती

राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी या भटक्या समाजाच्या समस्या जाणून घेतल्या त्यांच्या लक्षात आले की या लोकांना पोटभर अन्न आणि हाताला काम एका ठिकाणी स्थिर राहायला मिळाले कि हे लोक चोरी करणार नाहीत.आणि त्यासाठी महाराजांनी या लोकांसाठी सोनतळी या ठिकाणी कॅम्प उघडला या ठिकाणी महाराजांनी अनेक विहिरींची खोदकाम सुरू केले त्या ठिकाणी या भटक्या जमातीतील लोकांना कामे दिली त्या विहिरीतून मिळालेल्या दगडाचा वापर घरे बांधण्यासाठी केला या घरात या भटक्या जमातींना एका ठिकाणी राहण्याचे शिकवले. कामाच्या बदल्यात त्यांना पोटभर अन्न मिळू लागले त्यामुळे या जमातीने चोरी करणे सोडून दिले महाराजांना या बदनाम भटक्या समाजातील लोकांवर विश्वास ठेवला.त्यांच्या महत्त्वाच्या ठिकाणी नेमणुका केल्या.जो फाशीपारधी समाज चोरीसाठी प्रसिद्ध होता त्याला पहारेकरी बनवले आणि खऱ्या अर्थाने समाजाच्या प्रवाहात आणण्याचे काम छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी केले.

**निष्कर्ष :**

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज सर्वसामान्य सर्वसमावेशक कार्य करणारे राज्यकर्ते होते.

२) राजश्री छत्रपती शाहू महाराजांना समाजातील सामान्य लोकांच्या प्रश्नांची जाण होती

३) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विसाव्या शतकात केलेली समाज सुधारण्याची कामे महत्त्वाचे आहेत.

४) महाराजांनी राजसत्तेचा वापर समाजातील अनिष्ट रूढी प्रथा परंपरा नष्ट करण्यासाठी केला.

५) महात्मा फुले यांनी सुरु केलेली सामाजिक चळवळ पुढे नेण्याचे काम राजश्री छत्रपती शाहू महाराज यांनी केले आहे.

**संदर्भ सूची :**


१) कीर धनंजय,राजश्री शाहू छत्रपती-एक समाज क्रांतिकारी राजा,पाप्युलर प्रकाशन मुंबई,१९८८,पृ ९४

२) डॉ.पवार जयशिंगराव, राजश्री शाहू छत्रपती:एक मागोवा,सुमेरू प्रकाशन ,२००४

३) साळुंखे हिंदुराज, राजश्री शाहू महाराजांच्या आठवणी. पृ ७५

४) सावंत मधु, राजश्री शाहू महाराज,निर्मल प्रकाशन नांदेड,अ ५, पृ २३

५) कठारे अनिल,फुले शाहू लोकहितवादी,पूनम प्रकाशन,कंधार,२००७,पृ ४०.

६) पाटील शामराव,(संपा) राजश्री शाहू छत्रपती निवडक आदेश ,मुंबई, पृ ८४

७) डॉ.जाधव रमेश,लोकराजा शाहू छत्रपती,सुरेश एजन्शी,पुणे,२००२, पृ १३२